# <u>बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे ऑगस्ट २०११</u>

## नागपाडा पोलीस ठाणे
## गु.र.क्र २२७/११, कलम ३६३,३९२,१२०(ब),३४ भादवि

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गु.र.क्र व कलम | — | गु.र.क्र २२७/११<br>कलम ३६३,३९२,१२०(ब),३४ भादवि |
| २) | गु.घ.दि व वेळ | — | दिंनाक १३.०८.२०११ रोजी<br>०६.४५ वा ते ०८.०० वा दरम्यान |
| ३) | गुन्हा उघडकीस | — | दिनांक १७.०८.२०११ रोजी |
| ४) | फिर्यादी | — | श्री.नागेश श्रीकांत धुमाळ, वय २४ वर्षे,<br>धंदा—नोकरी रा.ठि. मु.पो. आदर्की बुद्रुक,<br>ता. फलटण, जि. सातारा. |
| ५) | बळीत | — | वरील प्रमाणे फिर्यादी |
| ६) | आरोपी अटक | — | १) दिनेश अनिरुध्द तावरे वय २६ वर्षे<br>२) हरी मारुती डोमणे वय ४७ वर्षे<br>३) योगेश शाहूराज भगोले वय २५ वर्षे<br>४) मंगेश जगन्नाथ कारंडे वय २५ वर्षे<br>५) प्रकाश गंगाराम धायगुडे वय २३ वर्षे |

**गुन्हयाची हकिगत**—दिनांक १२/०८/२०११ रोजी फिर्यादी मिरज येथून न्यु इंडीया कुरिअर कपंनीची रोख रक्कम रु. २३,००,०००/— घेवून बसने दिनांक १३/०८/२०११ रोजी सकाळी ०६.४५ वा. सुमारास मुंबई सेंट्रल येथे उतरुन रोडवर टॅक्सी पकडत असताना त्याचे मागावर आलेल्या दोन आरोपीतांनी फिर्यादीस त्यांच्या इंडीका कार मध्ये जबरदस्तीने बसवून सी.बी.डी बेलापूर येथे नेवून फिर्यादी सोबत असलेली रोख रक्कम, मोबाईल हॅन्डसेट इत्यादीची जबरीचोरी करुन फिर्यादीस सी.बी.डी बेलापूर येथे सोडून दिले.

सदर गुन्हयाचा तपासात कोणताही दुवा नव्हता फिर्यादीने दिलेला गाडी क्रमांक हा सातारा आर.टी.ओ. कडून तपासला असता तो दुचाकी वाहनाचा आढळला. तसेच फिर्यादी काम करीत असलेल्या कंपनीतील इतर कामगारांची चौकशी केली असता चौकशीमध्ये मागील वर्षी नमूद कंपनीतून काम सोडून गेलेला **लातूर कार्यालयाचा कामगार दिनेश तावरे (प्लानर)** याची माहिती मिळवली. तपासादरम्यान यापुर्वी त्याने अशा प्रकारचा गुन्हा केल्याची माहिती मिळाली त्यास बारामती, जि. पुणे येथून ताब्यात घेतले.

त्याच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये त्याने नमूद गुन्हयाची योजना उस्मानाबाद कारागृहात असताना त्याच्यासोबतचे दोघे आरोपी आणि इतर दोन आरोपींच्या मदतीने आखली व सदरचा गुन्हा केला आहे. त्याचेकडे कौशल्यपूर्ण केलेल्या तपासात वरील प्रमाणे इतर आरोपीतांना अटक केली आहे.

आरोपींविषयी काहीही माहिती नसताना गुन्हयातील सहभागी **चारही आरोपी आणि गुन्हयाची योजना आखणारा आरोपी** याचेकडून जबरीने चोरी केलेली मालमत्ता रोख रक्कम रु. २३,००,०००/— पैकी रोख रक्कम रु. २०,००,०००/— व सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन अशी एकूण रु. २०,०१,०००/— ऐवज हस्तगत केला आहे.

एकदरीत नागपाडा पोलीस ठाणेचे नमुद पथकाने पोलीस कर्तव्यातील गुन्हे तपासाचा व्यवसायीक कस लावून सदरचा **अपहरणासह जबरीने चोरी** अशा अतिशय कठिण व दुवा नसलेल्या गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा.पोलीस आयुक्तांनी** त्यांना **ऑगस्ट २०११** चे **बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ठ गुन्हेशोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

<u>तपास पथकातील अधिकारी व अंमलदार</u>

१) वपोनि संजय कदम

२) पो.नि. शिवाजी कदम

३) पो.उ.नि. संजय गायकवाड,

४) पो.ना.क्र. २५४६७/अर्जुन पाटील

५) पो.ना.क्र. २८९७२/ गणेश वायकर

६) पो.ना.क्र. २४४१०/ वसंत तरटे

७) पो.शि.क्र. ०११०/ धमेद्र ठाकूर

८) पो.शि.क्र. ०४०३७८/ सचिन सावंत